ISSN 2230-7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

## मराठी समाजशास्त्र परिषद

वर्ष ३६ वे, अंक २३ वा, डिसेंबर, २०१८.

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warora
Dist. Chandrapur

ISSN 2230-7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

वर्ष ३६ वे | अंक २३ वा | डिसेंबर, २०१८

मुख्य संपादक :—
डॉ. सरोज आगलावे

कार्यकारी संपादक :—
डॉ. राहुल भगत

संपादक समिती सदस्य :—
डॉ. दिपक पवार, डॉ. प्रदीप गजभिये,
प्रा. जयेन्द्र पेंडसे डॉ. प्रमोद पाटील,
प्रा. राजकुमार भगत, प्रा. विनोद शेंडे,

संपादकीय सल्लागार मंडळ :—
डॉ. प्रकाश बोबडे, डॉ. प्रदीप आगलावे,
डॉ. रमेश पांडे, डॉ. बी. के. स्वाई,
डॉ. मनोहर बुटे, डॉ. भा. की. खडसे.

संपर्क पत्ता :—
अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद,
द्वारा : समाजशास्त्र विभाग, महिला महाविद्यालय, नंदनवन नागपूर
website :www.mspmonline.com E-mail : marathisocio@gmail.com

टंकण व मांडणी : श्री. मनीष पडोळे, दर्शन कम्प्यूटर्स, तुमसर जि. भंडारा.
मुद्रीत शोधक : डॉ. नलिनी बोरकर

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या आजीव सदस्यांना अंक विनामूल्य.

सुचना : या अंकातील लेखकांनी व्यक्त केलेली मते ही त्या त्या लेखकांची आहेत. या मतांशी मराठी समाजशास्त्र परिषद अथवा संपादक मंडळ तसेच प्रकाशक, मुद्रक सहमत असेलच असे नाही.

Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Waror
Dist. Chandrapur

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेखाचे शिर्षक | लेखक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | अल्पसंख्याकांची अस्मिता: तात्वीक भ्रम आणि व्यावहारिक संदर्भ | जगन कराडे | ...१ |
| २. | नैसर्गिक संसाधन आणि सामाजिक न्याय... | संपत काळे | ...६ |
| ३. | उत्तर जागतिकीकरणातील उपेक्षीतांचे संघटनीकरण | धनराज पाटील | ...११ |
| ४. | सायबर स्त्रीवाद | प्रविण घोडेस्वार | ...१६ |
| ५. | आदिवासी समाज व कुमारीमातांची समस्या | श्रीराम खाडे | ...१९ |
| ६. | शासनाचे विनाअनुदान धोरण व मराठवाड्यातील उच्च शिक्षण | हनुमंत मिसाळ | ...२४ |
| ७. | महिला सक्षमीकरणातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान | ज्योती पोटे | ...२८ |
| ८. | देवदासी प्रथा: एक समाजशास्त्रीय चिंतन | जया लाडे | ...३१ |
| ९. | भारतीय महिलांचा राजकीय सहभाग | प्रविण मुधोळकर | ...३६ |
| १०. | भटक्या विमुक्त समाजातील वर्तमान समस्या व परिवर्तन | दिपक पवार | ...४१ |
| ११. | जागतिक तापमान वाढीचे संभाव्य धोके व उपाययोजना | बाळकृष्ण रामटेके | ...४४ |
| १२. | बचत गटाच्या संकल्पनेतील महिला सशक्तीकरण | गणेश बहादे | ...४७ |
| १३. | समाजशास्त्र : समस्या व आव्हाने | कमलकिशोर इंगोले | ...४९ |
| १४. | जागतिकीकरणाचा आदिवासी समाज जीवनावरील परिणाम | मनोहर येरकलवार | ...५२ |
| १५. | सेझ जमीन अधिग्रहण विरोधी शेतकऱ्यांचा संघर्ष | मंजुषा नळगीरकर | ...५६ |
| १६. | जेष्ठ नागरिकाश्रमात राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांची धार्मिक स्थिती | राजेंद्र बगाटे | ...६१ |
| १७. | भारतीय राज्यघटनेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान | के. एस. काळे | ...६७ |
| १८. | महाराष्ट्रातील दुष्काळ निवारण : एक काळाची गरज | सुरेश धनवडे | ...७१ |
| १९. | सरोगसी माता | विलास पवार | ...७४ |
| २०. | महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाची गती आणि स्थिती | नारायण कांबळे | ...७७ |
| २१. | आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबाना भेडसावणाऱ्या समस्या | रामेश्वर मोरे | ...८३ |
| २२. | सुशिक्षित बेरोजगारी आणि गुन्हेगारी | किशोर राऊत | ...८५ |
| २३. | महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचे बदलते विविध पैलू | सुधा खडके | ...८८ |
| २४. | प्रसार माध्यम आणि ग्रामीण युवकांचे वर्तन | एस. के. राठोड | ...९१ |
| २५. | महिला सबलीकरण | हर्षला सुर्यवंशी | ...९६ |
| २६. | लिंगभाव विषमता : माता, बाल कुपोषण | भगवान मनाळ | ...९८ |
| २७. | लोकसंख्या विस्फोट : एक सामाजिक समस्या | अशोक सालोटकर | ...१०२ |
| २८. | जेष्ठांच्या समस्या व जेष्ठ नागरिक चळवळीची भूमीका | रविंद्र विखार | ...१०४ |
| २९. | काव्यसृष्टीत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंचे योगदान | संतोष मेंडेंकर | ...१०६ |
| ३०. | शिक्षणाच्या खाजगीकरणाचा भिल्ल जमातीवरील प्रभाव | श्रीनिवास पिलगुलवार | ...१०८ |
| ३१. | जातीभेदाचे मूलगामी चिंतन (ग्रंथ समिक्षण) | प्रियदर्शन भवरे | ...११४ |
| ३२. | २८ व्या मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाचा अहवाल | अरूण पौडमल | ...११८ |


Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warora
Dist. Chandrapur

Scanned with CamScanner

समाजशास्त्र संशोधन पत्रिका, वर्ष ३८ वे, अंक ९३ वा, डिसेंबर, २०१८. ISSN 2230-7745

# शिक्षणाच्या खाजगीकरणाचा भिल्ल जमाती वरील प्रभाव

डॉ. श्रीनिवास पिलगुलवार, समाजशास्त्र विभागप्रमुख, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, जि. चंद्रपूर ९८५०१८७२७८

**प्रस्तावना:—** स्वातंत्र्य प्राप्ती नंतर भारताच्या पूनर्निमितीसाठी राष्ट्रातील तत्कालीन राज्यकर्त्यांनी विविध क्षेत्रामध्ये सुधारणा घडण्याचे प्रयत्न सुरू केले. अशा प्रयत्नांमध्ये सर्वाधिक लक्ष केंद्रित केले गेले ते शिक्षणवस्थेवर. शिक्षणाच्या सर्व स्तरावर अगदी प्राथमिक शिक्षणापासून तर उच्च शिक्षण व व्यावसायीक शिक्षणात सुधारणा करून शिक्षणाचे पूर्नजीवन किंवा पूर्नगठण करणे आवश्यक आहे, हे सर्व सत्ताधाऱ्यांच्या लक्षात आले. सुमारे अर्धशतकापूर्वीच भारतात शिक्षण हे व्यक्तीमत्व विकासाचे, व्यक्तीच्या जडणघडणीचे प्रमुख साधन आहे असे मानले जात असे. हे विधान आजही तितकेच कालसुसंगत आहे. १९६२—६४ या काळात डॉ. डी. एच. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शिक्षण आयोग नेमला गेला होता. त्या आयोगाच्या अहवालात शिक्षण हे राष्ट्राच्या विकासाचे प्रभावी माध्यम आहे ही भुमिका घेतल्या गेली होती. यामुळे शिक्षणाच्या उद्दिष्टांची आकृतीबंधाची आणि कार्यपध्दतीची पूर्नमांडणी केली गेली. कालांतराने २१ व्या शतकाच्या पहिल्या दशकात शिक्षणाचे मुख्य प्रयोजन ज्ञान निर्मिती आणि ज्ञानाधिष्ठीत समाज निर्माण करणे याला अग्रक्रम देण्यात येऊ लागला आहे. परंतु शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञानाधिष्ठीत समाज निर्माण करणारी व्यवस्था कुठेतरी आदिवासी समाजाच्या संदर्भात विचार करण्यात कमी पडत आहे. ही बाब आपल्या निदर्शनास येत आहे.

"शिक्षण हा कोणत्याही समाजाच्या सुधारणेचा मुख्य पाया आहे. मागासलेल्या समाजात शिक्षण नसेल तर आर्थिक किंवा सामाजिक प्रगतीसाठी कितीही प्रयत्न केले तरी ते फोल ठरतात. महाराष्ट्रात जे समाज ५० वर्षापूर्वी मागासलेले होते, त्यांच्यामध्ये सामाजिक व शैक्षणिक प्रगती घडवून आणण्यात शिक्षण मुख्यत: कारणीभूत झालेले आहे."[१] शिक्षणामुळे नियोजित सामाजिक बदलाच्या प्रक्रियेबरोबर विकासासाठी गती मिळते. शैक्षणिक गुणवत्ता असणाऱ्या व्यक्तीस व त्यांच्या कुटुंबीयास होणाऱ्या फायद्याबरोबर समाजासही निश्चितच फायदा होऊ शकतो. कारण शिक्षणामुळे अधिक कसदार व अधिक कार्यक्षम असे मानवी भांडवल निर्माण होते. आदिवासी समाज हा आज अज्ञानाच्या आणि दारिद्रयाच्या अंधारात चाचपडत आहे. खऱ्या अर्थाने या समाजाच्या प्रगतीस गती मिळवून देण्याची कुवत केवळ शिक्षणाच्या प्रक्रियेस आहे असे म्हणणे अतिशयोक्तीचे निश्चितच होणार नाही. आदिवासी भागात शिक्षणाची पहाट होऊन काही फार काळ लोटलेला नाही. समोर डोंगरासारख्या अडचणी असून सुध्दा त्या अडचणींकडे कधी पाठ फिरवून तर कधी त्या अडचणींना सामोरे जाऊन आज आदिवासी मध्ये साक्षरतेची जी वाटचाल होत आहे ती स्फुर्तीदायक व आशादायक असली तरीसुध्दा शिक्षणाच्या या शर्यतीमध्ये खाजगीकरणाचा अडथळा हा दुर्लक्ष करण्यासारखा निश्चितच नाही.

**संशोधन विषयातील संकल्पना :— १) शिक्षण :—** शिक्षण हा शब्द इंग्रजीतील Education या शब्दाचे मराठीतील रूपांतर होय. ज्याची उत्पत्ती लॅटीन भाषेतील Educare या शब्दापासून झाली असे मानले जाते. ज्याचा शाब्दीक अर्थ पालन पोषन करणे असा मानला जातो. शिक्षण ही एक अशी प्रक्रिया आहे की ज्याच्या माध्यमातून व्यक्तीचे शारीरीक, मानसिक, पालनपोषन केले जाते. शिक्षण हे व्यक्तीचे व्यक्तीमत्व विकसीत करण्यास विशेष सहाय्यता प्रदान करते. शिक्षणाच्या संदर्भात काही विचारवंतानी आपली मते पूढीलप्रमाणे मांडली आहेत. रविंद्रनाथ टागोर यांच्या मते "आपल्या जीवनात आणि संपूर्ण सृष्टीत समरसता निर्माण करणे शिक्षणाचे कार्य आहे". डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, "शिक्षण ज्ञान ग्रहण करण्याची प्रक्रिया असून शिक्षणाने व्यक्ती शीलवान व सौजन्यशील बनतो".

**२) खाजगीकरण :—** भारतीय अर्थव्यवस्थेत रचनात्मक बदल घडवून आणण्यासाठी १९९१ मध्ये जे नवीन आर्थिक धोरण जाहीर केले त्या धोरणातील एक महत्वाची संकल्पना म्हणजे "खाजगीकरण" होय. सार्वजनिक क्षेत्रातील किंवा सरकारची मालकी असणाऱ्या उद्योगाकरिता राखून ठेवलेले क्षेत्र खाजगी क्षेत्रामधील उद्योगांना खूले करण्याच्या प्रक्रियेला खाजगीकरण म्हणता येईल. भारतात २००५ नंतर शिक्षणाच्या खाजगीकरणाला सुरूवात झाली. खाजगीकरणाच्या संदर्भात काही विचारवंतानी आपली मते मांडली आहेत ते पूढीलप्रमाणे. पीटर ड्रकर यांच्या मते, "खाजगीकरण म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगातील शासकीय भांडवल काढून घेण्याची प्रक्रिया होय". डि. आर. पेंडसे यांच्या मते, "खाजगीकरण म्हणजे राष्ट्रीय आर्थिक व्यवहारातील सरकारचा सहभाग कमी करणे होय"



Scanned with CamScanner

३) भिल्ल जमात:— "भिल्ल जमातीच्या लोकांची वस्ती प्रामुख्याने महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थान मध्यभारत इ. भागात आढळतात. दुष्काळामध्ये काही भिल्ल सिंध मध्येही जाऊन राहिले आहेत. भिल्ल जमातीचे लोक निरनिराळ्या राज्यात राहत असले तरी त्यांचे आचार, विचार, धर्म यामध्ये फारसा फरक आढळत नाही. मध्य पूर्वेतून आलेल्या प्रोटो—ऑस्ट्रेलॉईड लोकांचे भिल्ल, कोळी व शबर हे वंशज होत असे मानवशास्त्रज्ञाचे मत आहे."[२] "भिल्ल ही महाराष्ट्रातील ऐतिहासीक महत्वाची व संख्येने अधिक असणारी प्रमुख जमात आहे. महाराष्ट्रात "सातपूडा प्रदेश" हा प्रामुख्याने भिल्लांचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. सातपूडा पर्वतांच्या रांगामध्ये हा प्रदेश विखूरलेला आहे. गुजरात आणि मध्यप्रदेशातील पर्वत रांगाचा भाग सोडला तर सातपूडा पर्वताच्या रांगा महाराष्ट्रात अमरावती, धुळे, जळगाव आणि औरंगाबाद जिल्ह्यात पसरलेल्या आहेत. भारतातील सर्वाधीक लोकसंख्या असलेली जमात म्हणून भिल्ल जमातीला ओळखले जाते. महाराष्ट्रात भिल्लांची लोकसंख्या १०००००० च्या जवळपास आहे."[३]

''भिल्ल हा शब्द संस्कृत भाषेतील 'भिल्ल' या शब्दाचे तद्भव रूप आहे. जे स्वंय संस्कृतमधील 'भिल—बिल—भेदने' या धातूपासून मुलबंध्द झाला आहे. संस्कृतमध्ये भिल्ल हा शब्द 'म्लेंच्छ' देश आणि जाती म्हणजेच शुद्र प्रदेश आणि शुद्र जाती यासाठी वापरला जातो 'म्लेंच्छ' हा संस्कृत शब्द आर्येत्तर लोकांसाठी अनेक शतकांपासून उपयोगात आणला जात असे. कालांतराने हा शब्द समाजातील निम्न जाती आणि जमातीसाठी अवहेलना आणि तिरस्कार व्यक्त करण्यासाठी उपयोगात आणण्यात आला.''[४]

**अध्ययनाचे उद्देश :—** १) जागतिकीकरणामुळे शिक्षणाचे खाजगीकरण होत आहे का? ते अभ्यासणे. २) शिक्षणाच्या खाजगीकरणाचा भिल्ल जमातीवर काय परिणाम होत आहे? ते अभ्यासणे. ३) शिक्षणाच्या खाजगीकरणातून शैक्षणिक भांडवलवादाचा उदय होत आहे का? ते अभ्यासणे.

**गृहीत कृत्ये:—** १) जागतीकीकरण हेच शिक्षणाच्या खाजगीकरणास प्रमुख जबाबदार घटक आहे. २) शिक्षणाच्या खाजगीकरणाचा भिल्ल जमातीच्या लोकांवर नकारात्मक परिणाम होत आहे. ३) भारतात अलिकडील काळात शैक्षणिक भांडवलदार उदयास आले आहे. त्यास शिक्षणाचे खाजगीकरण व सरकारचे धोरण जबाबदार आहे.

**अध्ययन पध्दती :—** प्रस्तूत शोध निबंधासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलनाच्या तंत्राचा उपयोग करण्यात आला आहे. प्राथमिक तथ्य संकलनाच्या तंत्रापैकी प्रश्नावली, अनुसुची, निरिक्षण इ. तंत्राचा उपयोग तथ्यांच्या संकलनासाठी करण्यात आला आहे. तर व्दितीयक तथ्य संकलनाच्या तंत्रापैकी, शासनाचे वार्षिक अहवाल, ऐतिहासीक कागदपत्रे, अध्ययन विषयाशी निगडीत प्रकाशित, अप्रकाशित लेख, संदर्भ ग्रंथ, मासिक, वर्तमानपत्रे इ. चा आधार घेण्यात आला आहे. तसेच प्रस्तूत शोध निबंधाचा सैध्दातिक दृष्टीकोण मार्क्सवादी असून, मार्क्सवादी दृष्टीकोणातूनच अध्ययन समस्येचा अभ्यास करण्यात आला आहे. त्या आधारावरच निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

**अध्ययन क्षेत्र :—** प्रस्तूत शोध निबंधाच्या अध्ययनासाठी नांदेड जिल्हयातील भिल्ल जमातीच्या लोकांचा अभ्यास करण्यात आला आहे. नांदेड जिल्हा हे अध्ययनाचे कार्यक्षेत्र असून जिल्हयातील १६ तालूक्यांपैकी ४ तालूक्यांची (भोकर, हिमायतनगर, हदगाव, किनवट) निवड अध्ययनासाठी करण्यात आली आहे. या तालूक्यांतील ४ गावातील (थेरबन, पवना, आनंदवाडी, परोटी) भिल्ल जमातीच्या २०० कुटुंबांचा सहेतूक नमूना निवड पध्दतीचा उपयोग करून अध्ययनासाठी निवड करण्यात आली आहे.

**साहित्यांचे परिक्षण :—** शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या इतिहासाच्या अध्ययनावरून हे ज्ञात होते की, सर्वप्रथम १८८३ मध्ये लेस्टर वार्ड यांनी Dynamic Sociology नावाच्या ग्रंथात मानवाच्या प्रगतीचा प्रमुख घटक हा शिक्षण आहे असे ठासून नमूद केले आहे. परंतू सन १९१५—१६ पर्यंत शिक्षणाच्या समाजशास्त्राला स्वतंत्र अध्ययन शाखेचा दर्जा प्राप्त झाला नाही. १९३२ मध्ये डब्लू. वॉलर यांनी The Sociology of Teaching नावाचा ग्रंथ प्रकाशित केला आणि त्या ग्रंथात शिक्षणाच्या समाजशास्त्राला प्रबळ सैध्दांतीक आधार प्रस्तूत केला. जे.जि. जोगळेकर (१९२८)[५] यांनी पदव्यूत्तर पदवीच्या अध्ययनासाठी केलेल्या संशोधनात १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील शिक्षण व सामाजिक कल्पना हा विषय घेतला. शिक्षणाचा समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला. जोगळेकरांनी आपल्या अध्ययनात तत्कालीन मुंबई प्रांतातील शिक्षणाच्या वास्तव स्थितीचा आढावा घेतला आहे. सी. प्रवथम्मा (१९७४)[६] यांनी कर्नाटक राज्यातील अनूसूचीत जाती व जमातीच्या महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आर्थिक व शैक्षणिक समस्यांचा अभ्यास केला आहे. २६० विद्यार्थी व त्यांना अध्यापन करणाऱ्या ११३ प्राधापकांच्या अध्ययनातून प्रवथम्मा यांनी काही निष्कर्ष मांडले आहेत. एस.एम. दुबे (१९७४)[७] — यांनी आसाम मधील अनूसूचीत जाती व जमातीच्या महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा



Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warora
Dist. Chandrapur

256

Scanned with CamScanner

समाजशास्त्र संशोधन पत्रिका, वर्ष ३६ वे, अंक २३ वा, डिसेंबर, २०१८. ISSN 2230-7745

अभ्यास केला आहे. दुबे यांनी आपल्या अध्ययनात हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे की, उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आर्थिक व सामाजिक पार्श्वभूमी कशी आहे. शिक्षणाचा प्रभाव त्यांच्या जीवनावर किती आणि कसा पडत आहे याचे अध्ययन दुबे यांनी केले आहे.

तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन :— जागतिकीकरण ही एक बृहद सामाजिक परंपरा असून जी संपूर्ण मानवी जीवनाला आज प्रभावीत करीत आहे. ज्यात शिक्षण हा एक महत्वाचा घटक आहे. शिक्षण व्यवस्थेतील जागतीकीकरणाच्या प्रवेशाने सर्व स्तरातील शिक्षणाचे खाजगीकरण होत आहे. याचा परिणाम आदिवासी समाजातील शिक्षण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांवर होत आहे. शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे दलित, मागासवर्गीय व आदिवासींच्या शिक्षणाचे अनेक प्रश्न अलीकडील काळात निर्माण झाले आहेत. यांच्या शैक्षणिक प्रश्नांसाठी जागतिकीकरणाचे अपत्य म्हणून जन्मास आलेले खाजगीकरण हे आदिवासींच्या सर्वांगीन जीवनास प्रभावीत करित आहे.

जागतिकीकरण, वैश्वीकरण हे वस्तुत: एक दुसऱ्याचे पर्यायवाची शब्द आहेत. परंतू दोन्ही शब्दांचा अर्थ एकच आहे. जागतिकीकरण ही संकल्पना १९८० नंतर अध्ययनाचा मुख्य विषय बनून जगाच्या समोर आली आहे. आंतरराष्ट्रीय समाजशास्त्राच्या मुखपत्राने जागतिकीकरणाला समजून घेण्यासाठी स्टॉकहोम येथे स्वीडनच्या विदेश मंत्रालयाच्या सहयोगाने १९९८ मध्ये एका संम्मेलनाचे आयोजन केले होते. या संम्मेलनात समाजशास्त्राच्या एका गटाकडून जागतिकीकरणाला परभाषीत करण्याचा प्रयत्न करण्यात आला. जागतिकीकरणाच्या संदर्भात आपले मत व्यक्त करतांना समाजशास्त्रज्ञ म्हणतात जागतिकीकरणाच्या संकल्पनेचा अविष्कार १९९० च्या दशकाच्या प्रारंभिक वर्षात झाला आहे. १९९२ मध्ये 'ऐनी' आणि 'रॉबर्टस्टन' यांनी प्रथम जागतिकीकरण या संकल्पनेचा उपयोग आपल्या अध्ययनात केला आहे. रॉबर्टस्टन यांच्यामते, ''जागतिकीकरण अशी प्रक्रिया आहे जिचा मुख्य उद्‌देश भांडवलवादाचा विस्तार आणि समृध्दी करणे हा आहे''.भारतात जागतिकीकरणाची सुरुवात २० व्या शतकाच्या उत्तरार्धात झाली आहे. जेव्हा भारताने जागतिकीकरणाचा स्विकार केला त्यावेळेस भारताचे पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव व वित्तमंत्री डॉ. मनमोहन सिंग होते.

२१ मे १९९१ नंतर भारतात जागतिकरणाचा स्वीकार करण्यात आला आहे. १९९४ मध्ये जागतिक स्तरावर गॅट ची स्थापना झाली. म्हणजेच व्यापार आणि शुल्क आकारणी संबंधी सामान्य करार करण्यात आला. १ जानेवारी २००५ ला गॅट मध्ये सेवा क्षेत्राचा समावेश करून गॅट लागू करण्यात आला. गॅट मुळे भारतातील शिक्षण व्यवस्था ही विदेशी विद्यापीठांना खुली करण्यात आली. शिक्षणाच्या खाजगीकरणाचा मोठा आघात दलीत व बहुजन समाजातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मुळावर आला आहे.

''जागतिकीकरण हे खाजगीकरणाचे वैश्वीक रूप आहे. स्पर्धा हे त्याचे अविभाज्य अंग आहे. गुणवत्ता वाढविण्याशिवाय स्पर्धेत उतरण्याची क्षमता प्राप्त करता येत नाही. स्पर्धेत उतरल्याशिवाय गुणवत्ता सिध्द करता येत नाही. जागतिकीकरण हे सामाजिक न्यायाच्या तत्वाला आपल्या जवळ सहसा फटकू देत नाही. अशा अवस्थेत बहुजन व आदिवासींच्या शिक्षणाचे भविष्य अंधकारमय होण्याची भीती खाजगीकरणातून निर्माण होत आहे.''[6] जागतिकीकरण हे भांडवलशाहीला पोषक आहे ही गोष्ट उघड आहे. शिक्षणाच्या खाजगीकरणाचा सर्वात वाईट परिणाम हा आदिवासींच्या शिक्षणावर पडत आहे. शिक्षणाच्या खाजगीकरणातून निर्माण झालेल्या गुणवत्तेच्या स्पर्धेत भिल्ल जमातीतील शैक्षणिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांचा निभाव लागणे शक्य नाही.

क्षेत्रीय अध्ययनाव्दारे प्राप्त तथ्यांच्या विश्लेषणातून भिल्ल जमातीच्या २०० कुटुंब प्रमुखांकडून तथ्य संकलीत करण्यात आली आहेत. भिल्ल जमातीतील २०० कुटुंब प्रमुखांना जागतिकीकरणामुळे शिक्षणाचे खाजगीकरण होत आहे का? असे विचारले असता १५३ (७६.५०%) उत्तरदात्यांनी शिक्षणाच्या खाजगीकरणास जागतिकीकरण हेच जबाबदार आहे असे म्हटले. त्यामुळे आमच्या पाल्यांचे शैक्षणिक भविष्य हे अंधारकारमय होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे. शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे भिल्ल जमातीतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आरक्षण आणि विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा प्रश्न पालकांनी व्यक्त केला आहे. तर ४७ (२३.५०%) पालकांनी जागतिकीकरण हे शिक्षणाच्या खाजगीकरणाला प्रोत्साहित करित नाही असे मत नोंदविले. यांच्या मते सरकार आणि प्रशासन शिक्षणाच्या खाजगीकरणाला प्रोत्साहन देऊन आपल्या घटनात्मक कर्तव्यांकडे कानाडोळा करु शकत नाही असे या उत्तरदात्यांना वाटते.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारताने लोकशाही समाजव्यवस्थेचा पुरस्कार केला. जेव्हा देश स्वतंत्र झाला त्यावेळेस देशासमोर अनेक सामाजिक समस्यांची आव्हाने होती. त्यातील सर्वात मोठी समस्या म्हणजे आदिवासी व दलितांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणने, त्यांना त्यांच्या मागासलेपणापासून दूर करणे. हे करण्यासाठी उत्तम मार्ग म्हणून आदिवासी व



Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warora

Scanned with CamScanner

दलितांच्या विकासात शिक्षणाची भूमिका ही महत्वपूर्ण ठरु शकते हे शासनकर्त्यांच्या लक्षात आल्यानंतर आदिवासी व दलितांच्या उध्दारासाठी शासनाने वेगवेगळ्या योजना सुरु केल्या. परंतू अलीकडिल काळात शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे आदिवासींवर वाईट परिणाम होत आहे का? हे जाणून घेणे प्रस्तुत संशोधनाचा उद्देश आहे. शिक्षणाचे खाजगीकरण जर सर्वच स्तरातील शिक्षण व्यवस्थेत निर्माण झाले, तर भिल्ल आदिवासींच्या शिक्षणावर याचा काय परिणाम होईल? हे जाणून घेण्याचा प्रयत्न उत्तरदात्यांकडून करण्यात आला आहे.

नांदेड जिल्ह्यातील भिल्ल जमातीच्या २०० कुटुंबातील पालकांना विचारण्यात आले की, शिक्षणाच्या वाढत्या खाजगीकरणाचा काही परिणाम तुमच्या पाल्यांच्या शिक्षणावर होत आहे का? असा प्रश्न अनुसूचीच्या माध्यमातून पालकांना विचारण्यात आल्यानंतर १४८ (७४%) पालकांनी शिक्षणाच्या वाढत्या खाजगीकरणाचा वाईट परिणाम आमच्या मुलांच्या शिक्षणावर होत आहे, या मताचा स्वीकार केला. सरकारने पूढच्या काळात सार्वजनिक क्षेत्रातील कारखान्यांप्रमाणे निर्गुंतवणूकीचे धोरण सरकारी शाळांच्या संदर्भात राबविले तर याचा परिणाम भिल्ल जमातीतील आदिवासींच्या मुलांच्या शिक्षणावर अधिक होईल अशी भीती पालकांनी व्यक्त केली आहे. तर ५२ (२६%) पालकांनी शिक्षणाचे खाजगीकरण कीतीही मोठ्या प्रमाणात झाले तरी शासन आदिवासींच्या न्याय हक्कांवर गदा आणणार नाही असे मत नोंदविले परंतू असे मत नोंदविणाऱ्यांची संख्या अत्यल्प आढळून आली आहे.

"व्यापारीकरणातून, खाजगीकरणातून शासनाचा शिक्षण क्षेत्रात सकारात्मक हस्तक्षेप वाढण्याऐवजी नकारात्मक हस्तक्षेप नको तेवढा अधिक वाढला आहे. वास्तविकपणे देशात आर्थिक उदारीकरणाचे युग १९९१ साली सुरू झाले. लायसन्स, परमिट, परवानाराज बंद झाले. एका खिडकीसमोर उभे राहून नागरिक तिथे सर्व कामे करू शकतील ही नुसती जाहिरातबाजी आहे. प्रत्येक शासनाने नको तिथे हस्तक्षेप करून शिक्षण व्यवस्थेशी संबंधीत अनेक समस्या निर्माण केल्या आहेत. उदा :— व्यवसाय शिक्षणातील सर्व प्रवेश परिक्षा, शुल्क रचना यासर्व प्रक्रियेतून खाजगी शिक्षण संस्था चालकाव्दारे विद्यापीठ यंत्रणा, विद्यार्थी व पालक यांना दुर ठेवले जात आहे."[९] संस्थाचालक भांडवलदाराप्रमाणे दरवर्षी आपली आकडेवारी; विवरण पत्रे, शुल्क निर्धारण समितीला सादर करतात. आहे त्या शुल्कात आम्हाला खर्च करणे जमत नाही. आम्हाला शुल्क वाढीची परवानगी द्या, यासाठी शुल्क निर्धारण समितीला विनंती करून किंवा प्रसंगी संघटनात्मक पातळीवर राजकीय दबाव आणून त्यांच्याकडून दरवर्षी वाढीव दर मंजूर करून घेतला जातो. शासन अशा वेळी मुग गिळून गप्प बसत आहे. यामुळे समाजात शैक्षणिक भांडवलदार अधिक मोठ्या संख्येत निर्माण होत आहेत. राजकीय सत्ताधारी व भांडवलदारी मानसिकतेचे संस्थाचालक यांच्या संगनमताने देशातील शिक्षणाच्या खाजगीकरणाला समाजात प्रस्थापित करण्याचे प्रयत्न सूरू आहेत. त्यात त्यांना बरेचसे यशही प्राप्त झाले आहे. कार्ल मार्क्स यांनी सांगीतल्या प्रमाणे राजकीय सत्ताधारी हे भांडवलादारांच्या (संस्थाचालकांच्या) हातचे बाहूले बनून शिक्षणाच्या खाजगीकरणाला प्रोत्साहन देत आहेत. यांमुळे 'नाही रे' वर्गाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या आदिवासीच्या शिक्षणाची समस्या निर्माण होत आहे.

"जेष्ठ उद्योगपती श्री. राहूल बजाज यांनी ३० जूलै २००९ च्या Times of India या वर्तमान पत्राच्या अंकात 'Education Unbound' शिर्षकाचा लेख लिहीला आहे. 'Free college and from sarkari shackles universities' असे म्हणून त्यांनी सर्व निर्बंध हटवा शासकीय दास्यत्वातून उच्च शिक्षणाला म्हणजेच महाविद्यालये व विद्यापीठे यांना मुक्त करा. असे आवर्जून म्हटले आहे. त्यांचे थोडक्यात सुत्र असे आहे. शिक्षणाची मुक्त बाजारपेठ होऊ द्या. तोटा सहन करून काही कोणी शाळा, महाविद्यालये व विद्यापीठ चालऊ शकणार नाही".[१०] एकदा का संस्थाचालकांना असे निर्णय घेण्यासाठी वाव दिला की मग ते विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कात वाढ करायला मोकळे होतात. अलीकडिल काळात खाजगी शाळा महाविद्यालयाचे शिक्षण शुल्क व इतर शुल्क मिळून ही रक्कम अभ्यासक्रमानुसार लाख व कोटीतही आहे. इयत्ता पहिलीतील प्रवेशासाठी लाखो रूपये शुल्क पालकाकडून घेणाऱ्या खाजगी शिक्षण संस्था भारतात कार्यरत आहेत. उदा. दिल्ली पब्लिक स्कुल मध्ये जर पहिल्या वर्गात प्रवेश घ्यावयाचा असेल तर पालकांना १ लाख ५० हजार रूपये मोजावे लागतात. व्यावसायीक शिक्षणाची अवस्था तर भयावह आहे. वैद्यकिय पदवीच्या शिक्षणासाठी खाजगी वैद्यकिय महाविद्यालयात ६० लाख ते ८० लाख रूपये देणगी व नियमानूसारचे इतर शैक्षणिक शूल्क वेगळे भरावे लागते. वैद्यकीय अभ्यासक्रमातील पदव्यूत्तर पदवीसाठी २ कोटी ते ३ कोटी एवढी रक्कम प्रवेशसाठी देणगी म्हणून द्यावी लागते. हे सर्व शिक्षणाच्या खाजगी करणामूळे होत आहे. अशा स्थितीत भिल्ल आदिवासी विद्यार्थ्यांना एवढे महागडे शिक्षण पैसे खर्च करून घेणे शक्य होईल का? आदिवासी समाजातील विद्यार्थी डॉक्टर, अभियंता इ. होण्याचे स्वप्न शिक्षणाच्या



Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warora
Dist. Chandrapur

Scanned with CamScanner

खाजगीकरणाच्या युगात पाहू शकतील का? हा प्रश्न आदिवासी समाजाच्या अभ्यास करणाऱ्या संशोधकासमोर आहे. शिक्षणाचे वाढते खाजगीकरण हे आदिवासी समाजासमोर अनेक शैक्षणिक समस्या निर्माण करीत आहे, आर्थिकदृष्ट्या अतिशय विवंचनेत आयुष्यभर जीवन जगणाऱ्या आदिवासी लोकांना शिक्षण विकत घेऊन शिकणे शक्य होणार नाही. त्यासाठी सरकारने आदिवासींच्या सर्व स्तरातील शिक्षणाचे ओझे आपल्या खांद्यावर घेऊन त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. परंतू मार्क्सच्या भाषेत राजकीय सत्ताधारी हे भांडवालदारांचे हस्तक असल्यामुळे त्यांचा कडून 'नाहीरे' वर्गाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या आदिवासींना न्याय मिळेल अशी आशा बाळगणे बालीशपणा ठरण्याची शक्यता अधिक आहे.

शिक्षणाच्या वाढत्या खाजगीकरणाशी संबंधीत समस्याबाबत पालकांना त्यांना समजेल अशा भाषेत विचारण्यात आले की, शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे शैक्षणिक भांडवलदारांना प्रोत्साहन मिळत आहे का? असे विचारल्यानंतर १७३ (८६.५०%) पालकांनी होय असे म्हटले आहे. त्यांच्या मते सद्यस्थितीत शिक्षण क्षेत्रात मोठ—मोठे उद्योगपती पदार्पण करित आहेत. शिक्षणाच्या व्यापारिकरणाला चालना देण्यात भांडवालदारांची भूमिका महत्वपूर्ण आहे. २००५ नंतर भारतातही शिक्षण संस्थांना शिक्षणाचा व्यापार करण्याची संधी मिळाली आहे. या व्यवस्थेत शिक्षण संस्थांना कारखाना समजण्यात येत आहे. संस्थाचालक हे शैक्षणिक भांडवलदार बनले आहेत. शिक्षक, प्राध्यापक हे उत्पादन करणारे कामगार झाले आहेत, तर विद्यार्थी उत्पादीत वस्तू बनले आहेत. शिक्षणाच्या क्षेत्रात कारखानदारांचा शिरकाव होण्यामागे महत्वाचे कारण म्हणजे समाजसेवा नसून शिक्षणाच्या व्यवसायातून अधिकाधिक आर्थिक नफा प्राप्त करणे हे आहे. यामूळे भिल्ल जमातीतील बहुतांश उत्तरदात्यांना असे वाटते की, शिक्षणाच्या वाढत्या खाजगीकरणातून शैक्षणिक भांडवलदार आणि पर्यायाने शैक्षणिक भांडवलवादाचा उदय होत आहे. २७ (१३.५०%) भिल्ल जमातीच्या पालकांना असे वाटते की शिक्षणाच्या वाढत्या खाजगीकरणामुळे भांडवलदारांना प्रोत्साहन मिळत नाही. कारण सरकार आजही आपल्या धोरणांच्या माध्यमातून शिक्षण व्यवस्थेवर नियंत्रण ठेऊन आहे. त्यामूळे सरकार शिक्षणाच्या खाजगीकरणाला प्रोत्साहन देत असले तरी भांडवलदारांना प्रोत्साहन मिळेल असे आम्हाला वाटत नाही असे मत उत्तरदाते मांडतात. असे जरी असले तरी वरील निर्वचनावरून असा निष्कर्ष काढता येतो की, बहुतांश उत्तरदात्यांचे मत आहे की शिक्षणाच्या खाजगीकरणातून शैक्षणिक भांडवलवादांला प्रोत्साहन मिळत आहे.

**अध्ययनाचे निष्कर्षः—**

१) आदिवासींच्या शैक्षणिक विकासाशिवाय ज्ञानधिष्ठीत समाज निर्माण होणे अशक्य आहे.

२) समाजाच्या प्रगतीस गती मिळवून देण्याची क्षमता शिक्षणात आहे. ती गती शिक्षणच्या खाजगीकरणामुळे भिल्ल जमातीच्या लोकांच्या प्रगतीत अडथळा निर्माण करीत आहे.

३) सार्वजनिक क्षेत्रातील कारखाण्यांच्या निर्गुंतवणुकीकरणासारखे शैक्षणिक संस्थाचे खाजगीकरण होत आहे ते भिल्ल व इतर आदिवासींच्या विकासात अडथळा आहे

४) गॅट या कायद्यामूळे शिक्षणाच्या खाजगीकरणाला अधिक बळकटी प्राप्त झाली आहे.

५) जागतिकीकरण हेच शिक्षणाच्या खाजगीकरणास जबाबदार आहे.

६) शिक्षणाच्या खाजगीकरणाचा सर्वात वाईट परिणाम महाराष्ट्रातील भिल्ल जमातीवर पडत आहे. कारण भिल्ल ही महाराष्ट्रातील सर्वाधीक लोकसंख्या असणारी जमात आहे.

७) शिक्षणाच्या खाजगीकरणाचा बडगा आदिवासी, दलित व बहूजन समाजातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मुळावर आला आहे.

८) बहुजन व भिल्ल आदिवासींचे शैक्षणिक भविष्य अंधकारमय होण्याची भीती खाजगीकरणातून निर्माण होत आहे.

९) शिक्षणाच्या खाजगीकरणामूळे शैक्षणिक आरक्षण व शिष्यवृत्तीचा प्रश्न निर्माण होण्याची भीती भिल्ल जमातीतील पालकांनी व्यक्त केली आहे.

१०) खाजगीकरणाचा परिणाम म्हणून शासन शिक्षण क्षेत्रातील आपली जबाबदारी हळू—हळू कमी करत आहे.

११) राजकीय सत्ताधारी व भांडवलदारी मानसिकतेचे संस्थाचालक यांच्या संगनमताने शिक्षणाच्या खाजगीकरणाला प्रस्थापीत करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत.

१२) शैक्षणिक भांडवलदारांना प्रस्थापित करण्यासाठी 'Education Unbound' ची संकल्पना समाजात रूजविण्याचा प्रयत्न सरकारच्या माध्यमातून भांडवलदार करित आहेत.

१३) शिक्षणाच्या वाढत्या खाजगीकरणातून शैक्षणिक भांडवलदार आणि पर्यायाने शैक्षणिक भांडवलवादाचा उदय होत आहे.



Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warora
Dist. Chandrapur

Scanned with CamScanner

समाजशास्त्र संशोधन पत्रिका, वर्ष ३६ वे, अंक २३ वा, डिसेंबर, २०१८. ISSN 2230-7745

**शिफारशी:—**

१) आदिवासीवरील अन्याय दूर करण्यासाठी शिक्षणाचे खाजगीकरण थांबविणे आवश्यक आहे.

२) शिक्षणासारख्या क्षेत्राकडे अनुत्पादक घटक म्हणून पाहण्याची सरकारची मानसिकता बदलविणे आवश्यक आहे.

३) शिक्षणाचे होणारे खाजगीकरण आदिवासींच्या विकासात अडथळा बनत असल्यामूळे त्यावर शासनाने आधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

४) सत्ताधारी हे भांडवलदारांचे बटीक बनले आहेत. त्यांनी तसे न करता आपले घटनात्मक कर्तव्य पार पाडण्याकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

५) गॅट कायद्यातून शिक्षण, आरोग्य इ. जीवन आवश्यक घटकांना बाहेर काढणे आवश्यक आहे. ज्यामूळे बहुराष्ट्रीय कंपन्यांना आदिवासीचे शोषण करण्याची संधी मिळणार नाही.

६) महाराष्ट्रातील सर्वाधीक लोकसंख्या असणाऱ्या भिल्ल जमातीच्या लोकांवर खाजगीकरणाचा परिणाम होणार नाही याची काळजी शासनाने घ्यावी.

७) शैक्षणिक संस्थांचे निर्गुतंवणूकीकरण देशहीतासाठी घातक आहे. ते वेळीच थांबविणे आदिवासी व देशाच्या हिताचे आहे.

**संदर्भ :—**


१. गारे,गो. (१९९४).आदिवासींचे प्रश्न आणि परिवर्तन. औरंगाबाद, अमृत प्रकाशन.
२. जाधव,सु. (१९६९). भिल्ल जीवन आणि अविष्कार. पूणे, कॉन्टिनेंटल प्रकाशन.
३. गारे,गो. (२००१). महाराष्ट्रातील आदिवासी जमाती. पूणे, कॉन्टीनेंटल प्रकाशन
४. शर्मा,र. (२०००). वैदीक संपत्ती. पूणे, भारतीय संस्कृती कोश मंडळ.
५. *Jogalekar, J.(1928). Education and social Ideas in Maharashtra during 19th century Bombay. Bombay university.*
६. *Parvathamma,c.(1974).The study of scheduled cast of scheduled tribe college student in Karnataka. Mysore, Mysore University.*
७. *Dubey,s. (1974). The study of scheduled caste and scheduled tribe college students in Assam. Delhi I.C.S.S.R.*
८. वाघमारे, ज.(२००९). बदलते शिक्षण स्वरूप आणि समस्या. पुणे, पदमगंधा प्रकाशन.
९. धनागरे, द. (२०१०). उच्च शिक्षण ध्येयवादाकडून बाजारपेठेकडे. मुंबई, लोकवाड.मय गृह.
१०. उपरोक्त.
११. दोषी, एस. (२००१). द. भिल्ल. जयपूर, रावत पब्लीकेशन्स.
१२. लोकडे, एस (१९८६).आदिवासी समाज जीवन. नांदेड, नांदेड जिल्हा ग्रंथ निर्मिती समिती
१३. बिहारी, प. आणि लता मोरे (२०१०). भारतातील शिक्षण व्यवस्थेचा विकास.नागपूर, पिंपळापूरे ॲन्ड पब्लिशर्स,
१४. आगलावे,प्र. (२०००). संशोधन पध्दतीशास्त्रे व तंत्रे. नागपूर, विद्या प्रकाशन.
१५. कऱ्हाडे, बी. (२०११). शास्त्रीय संशोधन पध्दती. नागपूर, पिंपळापूरे ॲन्ड पब्लिशर्स.


Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warora
Dist. Chandrapur

Scanned with CamScanner